# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक १३/०५/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

**पो.स्टे. कन्हान हद्दीत अवैध कोळसा वाहतुकीवर धाड**
**स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई...**

दिनांक १३/०५/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक उपविभाग कन्हान अंतर्गत अवैध धंदयावर आळा घालनेकामी रात्री दरम्यान पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, पोस्टे कन्हान हद्दीतील कांद्री माईन्स येथे एक इसम महिन्द्रा गाडी मध्ये कोळसा लोड करून विक्री करीता नेणार आहे. अशा मिळालेल्या विश्वसनीय खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कांद्री माईन्स शिवारातील झुडपी जंगलामध्ये छापा मारला असता एक इसम महिन्द्रा पिकअप गाडीमध्ये कोळसा भरतांना मिळुन आला. त्यास ताब्यात घेवून त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव फारूख अब्दुल्ला शेख, वय २४ वर्ष, रा. कांद्री कन्हान असे सांगितले. त्याचे ताब्यातील कोळसा बाबत कागदपत्राची विचारणा केली असता त्याचे कडे कोणत्याही प्रकारचे कागदपत्र नसल्याचे दिसून आले. त्यानंतर सिक्युरिटी इंचार्ज रविकांत कांडे यांना सदर ठिकाणी बोलवुन शहानिशा केली असता त्यांनी सांगितले की, सदरचा कोळसा चोरीचा असल्याचे सांगितल्यावरून जप्ती पंचनामा कार्यवाही करून आरोपीचे ताब्यातुन कोळसा ५ टन कि. ६०,०००/—रू. व एमएच—२१/एक्स—१८५६ क्रमांकाची महिन्द्रा बोलेरो पिकअप गाडी कि ५,००,०००/— रू. असा एकुण कि. ५,६०,०००/—रू. चा माल जप्त करून आरोपी व मुद्देमाल पोस्टे कन्हान यांचे ताब्यात पूढील कायदेशिर कार्यवाही करिता देण्यात आलेला आहे. पोस्टे कन्हान पुढील तपास करित आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. वियजकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर ना. ग्रा. यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सपोनि अनिल राउत, पोहवा विनोद राउत, ज्ञानेश्वर राउत, पोना प्रणय बनाफर, विरेन्द्र नरड यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर